# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ, औरंगाबाद.

**Old Power House Premises, Dr.Ambedkar Road, Aurangabad. Phone: 0240-2336172**


**Case No: CGRF /AZ /U / 118 / 2008 / 39/**

**To,**
**The Executive Engineer ( Administration)**
**O/O Superintending Engineer**
**O&M Urban Circle, M.S.E.D.C.L.,**
**Aurangabad.**

Sub:- Forwarding of grievance in respect of Shri Praveen Namdeo Phuse,Yograj Complex,Shop No.9, Hanuman Chowk,NS-4 CIDCO,Aurangabad.( Consumer No. 490012054359)

**Dear Sir**

Please find enclosed herewith a copy of the grievance application received by the Forum from Shri Praveen Namdeo Phuse,Yograj Complex,Shop No.9, Hanuman Chowk, NS-4, CIDCO, Aurangabad.( Consumer No. 490012054359)

You are requested to submit your parawise reply on the grievance within 15 days from the date of this letter

**The hearing of the grievance is fixed on date 14.08.2008 at 11.30 Hrs.**

**Encl As above**.

Copy to :
Shri Praveen Namdeo Phuse,
Yograj Complex, Shop No.9, Hanuman Chowk,
NS-4, CIDCO,
Aurangabad.

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

**तक्रार क्र.सीजीआरएफ/एझेड/यु/११८/२००८/३९**

**तक्रार दाखल दिनांक ;- ३१/०७/२००८**
**निकाल दिनांक ;- ०२/०९/२००८**

**श्री प्रविण नामदेव फुसे,**
**योगराज कॉम्प्लेक्स दु.नं.९,**
**हनुमान चौक,एन एस ४ सिडको, औरंगाबाद.**
**(ग्राहक क्र.४९००१२०५४३५९)**

**अर्जदार/ग्राहक**

**विरुध्द**

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित (शहर मंडळ,) औरंगाबाद.

विषयः- महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल विनियम २००६) च्या अंतर्गत गा-हाणे.

१) अर्जदाराने ग्राहक गा-हाणे निवारण मंचासमोर 'अनुसुची-अ' मध्ये, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल ) विनियम २००६ च्या नियम ६.१० अंतर्गत

तक्रार दाखल केली आहे. अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीची एक प्रत दिनांक २०/०५/२००८ रोजी औरंगाबाद शहर मंडळाचे कार्यकारी अभियंता ( प्रशासन ) व नोडल अधिकारी, औरंगाबाद यांना पाठविण्यात आली व या बाबतीत त्यांचे म्हणणे १५ दिवसाच्या आत दाखल करण्याचे सांगण्यात आले. अर्जदाराच्या गा-हाण्याबाबतची सुनावणी दिनांक ०३/०६/२००८ रोजी ठेवण्यात आली.

२) ग्राहकाने दाखल केलेल्या तक्रारीचा सारांश खालीलप्रमाणे आहे.
अर्जदाराने वाणीज्य वापरासाठी वीज पुरवठा घेतला असुन वीज मीटर बंद पडल्यामुळे त्यांनी दिनांक १८/०६/२००८ रोजी संबधीत विभागाकडे ते बदलुन देण्याबाबत अर्ज केला, महावितरण कंपनीतर्फे ऑक्टोबर २००७ मध्ये त्यांचे मीटर बदलुन देण्यात आले पण हे नवीन मीटर सुध्दा ४ महीन्यानंतर बंद पडले, मीटर बंद असल्याच्या काळात त्यांना ५८ युनिट तर काही वेळेस १०० युनीट असा सरासरी वीज वापराच्या आधारावर वीज बिल आकारणी करण्यात आली, अर्जदाराच्या म्हणण्यानुसार त्यांच्या वीज वापर अंत्यत कमी असुन त्यांच्या वीज वापराच्या आधारावर वीज बिल आकारणी करावी व सरासरीवर आधारीत बिल, त्यावरील व्याज व दंड रद्द करण्याबाबत आदेश देण्याची विनंती त्यांनी मंचास केली आहे.

३) दिनांक १४/०८/२००८ रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अर्जदार श्री प्रवीण फुसे तसेच महावितरणचे नोडल अधिकारी श्री राठोड उपस्थित होते, नोडल अधिकारी यांनी दाखल केलेल्या जबाबानुसार अर्जदारास देण्यात आलेल्या सरासरीवर आधारीत वीज बिल दुरूस्त करून त्यास रूपये १३८३-७९/- कमी करून देण्याची तयारी दर्शविली. अर्जदाराचे मीटर हे जानेवारी २००८ यापुर्वीपासुन बंद असल्याचे व मीटर दोनदा बदलण्यात आल्याचे लक्षात

आल्यामुळे अर्जदाराचे पुर्ण सीपीएल तसेच मीटर बदली अहवाल दाखल करण्याचे आदेश नोडल अधिकारी यांना देण्यात आला, व पुढील सुनावणीची तारीख २७/०८/२००८ अशी निश्चत करण्यात आली.

४) दिनांक २७/०८/२००८ रोजी अर्जदार व नोडल अधिकारी सुनावणीस उपस्थित होते. नोडल अधिकारी यांनी सीपीएल, मीटर बदली अहवाल दाखल केला. अर्जदाराचा वीज वापर हा त्यांना सरासरीवर आधारीत देण्यात आलेल्या वीज बिलापेक्षा कमी आढळुन आल्यामुळे नोडल अधिकारी यांनी ३०/०८/२००८ पर्यंत सुधारीत बिल मंचात दाखल करण्याची परवानगी मागितली जी मंचाने मान्य केली व प्रकरण निकालासाठी राखुन ठेवले.

५) दोन्ही बाजुकडून मंचात दाखल करण्यात आलेल्या कागदपत्रावरून सीपीएल तसेच अर्जदाराचा वीज वापर व त्यास सरासरीवर आधारीत देण्यात आलेला वीज बिलाचे निरिक्षण केल्यावर मंचास असे आढळुन येते की, जुन २००५ पर्यंत अर्जदारास वीज मीटरवरील रिडिंग प्रमाणे बिल देण्यात येत होते.ऑगस्ट २००५ ते ऑगस्ट २००६ या काळातील वीज बिले सरासरीवर आधारीत देण्यात आलेली आढळुन येतात. सप्टेबर २००६ ते नोव्हेबर २००६ या काळात पुन्हा मीटर रिडींग प्रमाणे तर डिसेबर २००६ ते नोव्हेबर २००७ या काळात सरासरीवर आधारीत वीज बिले देण्यात आलेली आहेत. अर्जदाराचे मीटर १०/१२/२००७ रोजी बदलण्यात आले, डिसेबर २००७ ते जुलै २००८ या काळातील वीज बिल हे मीटर वरील नोदीप्रमाणे व अर्जदाराच्या वीज वापराप्रमाणे देण्यात आलेली असल्याचे आढळुन येतात. मीटर व्यवस्थित कार्यरत आसतांना म्हणजेच सप्टेबर २००६ ते नोव्हेबर २००६ व डिसेबर २००७ ते जुलै २००८ या काळातील अर्जदाराचा सरासरीवर वीज वापर हा १९ युनिट प्रतिमहा असा आढळुन येतो यावरून

अर्जदारास सरासरीवर आधारीत आकारण्यात आलेले ५६ व १०० युनिट वीज बिल हे चुकीचे व जास्त असल्याचे मंचाचे मत आहे व मंच याप्रकरणी खालील आदेश पारीत करीत आहे.

# आदेश

१) ऑगस्ट २००५ ते ऑगस्ट २००६ तसेच डिंसेबर २००६ ते नोव्हेबर २००७ या काळात देण्यात आलेले सरासरीवर आधारीत वीज बिल रद्द करण्यात येत आहे.
२) महावितरण कंपनीने अर्जदारास वरील काळासाठी १९ युनिट प्रतिमाह असे सरासरीवर आधारीत सुधारीत वीज बिल ३० दिवसाच्या आत द्यावे.
३) वरील प्रमाणे देण्यात येणा-या सुधारीत वीज बिलात कोणतेही व्याज व दंड आकारण्यात येवु नये.
४) वरीलप्रमाणे सुधारीत बिलात अर्जदाराने भरलेल्या रक्कमेची वजावट करावी.

वरील आदेशाचे ग्राहक व महावितरण कंपनी यांनी पालन करावे व त्याबाबत मंचास कळवावे.

गा-हाणे निकाली काढण्यात आले असुन हे ग्राहकास व वितरण कंपनीस कळवावे.

| | | |
|---|---|---|
| **हेमंत अ. कापडिया** | **आ. नि. सोनवणे** | **विष्णु अं. हंबिरे** |
| **सदस्य** | **सदस्य/सचिव** | **अध्यक्ष** |

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

जुने पावर हाऊस परिसर.डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, मिल कॉर्नर, औरंगाबाद. - ४३१ ००१, दुरध्वनी व फॅक्स -०२४० - २३३६१७२.

क्र.सीजीआरएफ/एझेड/यु/११८/२००८/३९ दिनांक ;-

**प्रति,**

**१) कार्यकारी अभियंता (प्रशासन),**
**अधिक्षक अभियंता यांचे कार्यालय,**
**म.रा.वि.वि.कं.म. शहर मंडळ, औरंगाबाद.**

**२) श्री प्रविण नामदेव फुसे,**
**योगराज कॉम्प्लेक्स दु.नं.९,**
**हनुमान चौक,एन एस ४ सिडको, औरंगाबाद.**
**(ग्राहक क्र ४९००१२०५४३५९)**

**विषय ;-** क्र.सिजीआरएफ/एझेड/अेयुआर/यु/११८/२००८/३९ गा-हाण्याचा आदेश.

वरिल विषयातील गा-हाण्याचा आदेश या पत्रा सोबत जोडला आहे.

ग्राहकास, जर आदेश मान्य नसेल तर तो विद्युत लोकपाल ( खाली दिलेला पत्ता ) यांच्याकडे आपले गा-हाणे आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसाच्या आंत दाखल करु शकता.

सोबत ;- वरिल प्रमाणे.

**विद्युतलोकपालाचा पत्ता,**
**विद्युत लोकपाल,**
**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग,**
**६०६-६०८, केशवा ईमारत,**
**बांद्रा - कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई - ४०० ०५१.**
**दुरध्वनी क्र. ०२२-२६५९०३३९.**

**सदस्य/सचिव**
**ग्राहक गा-हाणे निवारण मंच**
**म.रा.वि.वि.कं.म.औरंगाबाद.**